# हुताशनी पौर्णिमा अर्थात होळी

हिंदू प्रथेप्रमाणे नवीन वर्षाची सुरुवात गुढीपाडवा ह्या सणाने होते. हिंदू पंचांगाप्रमाणे चैत्र हा पहिला महिना तर अखेरचा फाल्गुन. फाल्गुन शुक्ल पौर्णिमा ही हुताशनी पौर्णिमा. फाल्गुन महिन्यातील ऊन तापलेले असते आणि थंडी सरल्याचा जणू दाखलाच देत फाल्गुन महिना येतो.

फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण देशभरात उत्साहात साजरा केला जातो. देशातील विविध प्रांतांत सण साजरा करण्यामागील इतिहास आणि तो साजरा करण्याची पद्धत जरी भिन्न-भिन्न असली, तरी त्यामागील उद्देश मात्र सारखाच असतो.

दुष्ट प्रवृत्ती आणि अमंगल विचार यांचा नाश करून सत्प्रवृत्तीचा मार्ग दाखवणारा उत्सव म्हणजे होळी. वृक्षरूपी समिधा अग्नीत अर्पण करून त्याद्वारे वातावरणाची शुद्धी करणे, हा उदात्त भाव होळी साजरी करण्यामागे आहे.'

प्रांतापरत्वे फाल्गुनी पौर्णिमेपासून पंचमीपर्यंतच्या ५ - ६ दिवसांत, कुठे दोन दिवस तर कुठे पाचही दिवस हा उत्सव साजरा केला जातो. उत्तरेत याला होरी, दोलायात्रा, तर गोवा आणि कोकण भागात शिमगा आणि अन्य महाराष्ट्रात होळी, हुताशनी महोत्सव अन् होलिकादहन अशी नावे आहेत. दक्षिणेत कामदहन तर बंगालमध्ये दौलायात्रा म्हणून होळीचा सण साजरा करतात. याला ‘वसंतोत्सव’ अथवा ‘वसंतागमनोत्सव’ असेही म्हणतात कारण वसंत ऋतूच्या आगमनासाठी साजरा करायचा उत्सव.

होलिका सणाविषयी एक आख्यायिका आहे. पूर्वी ढुंढा किंवा ढौंढा नामक राक्षसीण गावात शिरून लहान मुलांना त्रास देत असे. तिला गावाबाहेर हाकलून देण्याकरिता लोकांनी पुष्कळ प्रयत्न केले; पण ती जाईना. नगरातील मुलांना त्रास देणाऱ्या ‘ढुंढा’ नावाच्या राक्षसिणीचा प्रतिकार कसा करावा ? याविषयी नारदमुनी युधिष्ठिराला उपाय सांगतात. ‘नगरातील सर्व लोकांना तू अभय दे. त्यामुळे ते आनंदित होतील. त्यांची मुले आनंदाने घराबाहेर पडू देत. त्यानंतर -

सञ्चयं शुष्ककाष्ठानाम् उपलानां च कारयेत् ।
तत्राग्निं विधिवत् बुद्ध्वा रक्षोघ्नैः मन्त्रविस्तरैः ॥

ततः किलकिलाशब्दैः तालशब्दैः मनोरमैः ।

तम् अग्निं त्रिः परिक्रम्य
गायन्तु च हसन्तु च ॥

जल्पन्तु स्वेच्छया लोकाः निःशङ्का यस्य यन्मनः ।
तेन शब्देन सा पापा
होमेन च निराकृता ॥

अदृष्टिघातैः डिम्भानां
राक्षसी क्षयम् एष्यति ।
सर्वदुष्टापहो होमः सर्वरोगोपशान्तिदः ॥

अर्थात : वाळलेली लाकडे आणि गोवऱ्या यांचा ढीग रचावा. तेथे रक्षोघ्न (राक्षसांना नष्ट करणाऱ्या) मंत्रांनी अग्नी प्रज्वलित करावा. त्यानंतर लहान मुलांप्रमाणे हर्षभरित शब्द करत (किलकिलाशब्दैः), मनोरम अशा टाळ्या वाजवत (तालशब्दैः मनोरमैः) अग्नीला ३ प्रदक्षिणा घालून गाणे गावे आणि आनंदाने हसावे. लोकांनी निःशंकपणे आणि स्वेच्छेनुसार त्यांच्या मनातील पाहिजे तेवढे बोलावे. अशा आनंदी शब्दांनी आणि (रक्षोघ्न) होमाने लहान मुलांना त्रास देणारी ती पापी राक्षसीण लोकांची दृष्टी पडल्याविनाच क्षीण होईल. हे राजा !’ फाल्गुन पौर्णिमेला सर्व दुष्ट शक्ती पळवून लावणारा आणि सर्व रोगांचे शमन करणारा होम करतात; म्हणून या तिथीला विद्वानांनी ‘होलिका’ असे म्हटले आहे. या श्लोकांत अग्नीला प्रदक्षिणा घालतांना कुठेही शिवीगाळ करावी, असा उल्लेख नाही. याउलट ‘किलकिल’, ‘मनोरम तालशब्द’ असे शब्द आले आहेत. यांचे अर्थ वर दिले आहेत.

गावाकडे होळी साजरा करण्याची रीत न्यारी. होळीच्या निमित्ताने गावात खरं तर शेतकरी बांधव, जळाऊ कचरा, जळाऊ लाकूडफाटा एकत्र करीत आणि त्याभोवती गोवऱ्या रचत. त्या होळीला सजवतात आणि मग संध्याकाळी तिची विधिवत पूजा केली जाते. अशी ही होळी अर्थात होलिका देवी ही विधीवत पेटवली जाते आणि तिला नारळ अर्पण करत, पुरणपोळीचा नैवैद्य अर्पण केला जातो. होळी भारतभर साजरी केली जाते, महाराष्ट्रात होळी मोठ्या प्रमाणात साजरी होते पण होळीचा खरा सण कोकणात साजरा केला जातो. कोकणातील चाकरमानी होळी आणि गणपतीला हमखास गावाला जाणार. कोळी आणि आगरी समाजात होळी ह्या सणाचे विशेष महत्त्व. वैज्ञानिकदृष्ट्या बघितलं तर होळी पेटवल्याने वातावरण शुद्धी होते, वातावरणातील अशुध्द द्रव्याचा नाश होतो. होळी हा सण लहानथोर एकत्र जमून साजरा करतात. होळी दहनाच्या वेळी बोंब मारायची प्रथा आहे. त्यामागचा दृष्टिकोन हा की, कळत नकळत आपले मित्र, नातेवाईक किंवा आप्त, शेजारी ह्यांच्याशी मतभेद, दुरावा असू शकतो. त्यातून अबोला निर्माण होतो. तो मनातील राग अथवा नकारात्मक विचार मनात

मूळ धरून असतात. अश्या नकारात्मक भावनांना मोकळी वाट करून द्यावी आणि राग लोभ संपून जावे ही ह्या 'बोंब' मारण्याविषयी भावना होय. होलिकोत्सव हा त्यासाठी एक उत्तम संधी असते. मनातील नकारात्मक भावना निघून गेल्या 'जणू माफ केले की मन साफ होतं.'

दिवाळी हा दीपोत्सव, सगळ्यात मोठा सण पण कोकणात दिवाळीपेक्षा होळीलाच जास्त महत्व. दिवाळी आणि होळी सणाच्या नावात खूप जवळीक वाटते परंतु सण साजरा करण्याची पद्धत अगदी भिन्न. दिवाळीत दिव्याची आरास करत, आकाशकंदील, पणत्या लावत दीपोत्सव साजरा होतो, तर होळीला लाकूडफाटा आणि गवऱ्याच्या साहृयाने सजवलेल्या होलिकेची पूजा करत, तिचे दहन केले जाते. दिवाळीतली मंगल पहाट, मंगल समयी, सुमधुर संगीताने साजरी होत असते तर, होळी रात्रीच्या वेळी पेटवून सगळ्यांच्या नावाने अधिकृत 'बोंब' मारत साजरी केली जाते. तरीही होळी आणि दिवाळीत काही सामायिक धागे आढळतात.

दिवाळीचे आगमन घराच्या रंगारंगोटीने होते तर होळीनंतर रंगपंचमी हा रंगांचा सण साजरा केला जातो. दिवाळीत घराघरात दिवे लावून सण साजरा होतो, तर होळीला बाहेर चौकात अग्नी पेटवून होलिकोत्सव साजरा होतो. दिवाळी हा देवांचा सण असला तर होळी हा सर्वसामान्यांचा सण आहे. दिवाळीला नवीन कपडे, रोषणाई आणि मिठाई ह्याचा बडेजाव तर होळीला ह्या सगळ्या औपचारिकतेला फाटा देत फक्त आनंद आणि हर्षोल्हास दिसतो. दिवाळी घरात आणि घराबाहेर दिव्यांची आरास तर होळीला अंतर्मनात उजेड पडलेला असतो जणू. मनातील राग, लोभ, मत्सर ह्या नकारात्मक विचारांचं दहन झाल्यामुळे मनातील वैरभाव दूर होऊन अंतर्मनात जणू सकारात्मक भावनेचा उजेड पडलेला असतो.

तरीही 'होळी' ह्या शब्दाला उगीच नकारात्मक रूप दिले गेले आहे. राजकारणी लोक निषेध व्यक्त करण्यासाठी एखाद्या वस्तूची 'होळी' करतात. इंग्रजांच्या कारकिर्दीत परदेशी वस्तूंची होळी करत निषेध व्यक्त केला जात असे. त्यामुळे निषेध व्यक्त करण्याचे साधन म्हणून त्याला 'होळी करणे' हा शब्दप्रयोग रूढ झाला. त्याच परंपरेचा वापर करायचा झाल्यास, होळीसमोर सात्विकपणे उभं राहत मनात असलेल्या सगळ्या नकारात्मक भावनांचं दहन अर्थात होळी केली तर, माणसाचं मन किती हलकं होईल. आपण मनात असंख्य नकारात्मक विचारांना थारा देत असतो. किंबहुना राग, लोभ, द्वेष, मोह, माया, मत्सर, वासना इ. नकारात्मक भावनांनी आपलं मन उगाच भरलेलं असतं, त्या नकारात्मक विचारांची होळी करत आणि इतर लोक आपल्याविषयी काय बोलतात ह्या अनिष्ट विचारांची होळी करत हा सण साजरा केल्यास, मन साफ होण्यास मदत होते आणि मग अजून पंधरा दिवसांनी येणारा चैत्र गुढीपाडवा हा हिंदू वर्षाचा पहिला दिवस आणि हिंदूंचा मोठा सण आनंदाने साजरा करण्यासाठी आणि वसंत ऋतूचे स्वागत करण्यासाठी सज्ज होता येईल. वसंत ऋतूत

निसर्गाने केलेली उधळण उत्साहाने अनुभवता येईल.

**- मनोज कुरुंभटी**